जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.२५/०९/२०२३
## दि.२४/०९/२०२३ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वारजे पो स्टे ४०५/२०२३,भादविक ३०७,३२३,५०४ |
| **फिर्यादी** | एक ज्येष्ठ नागरीक,वय-६० वर्षे,रा.ता.हदगाव,जि.नांदेड |
| **आरोपीत** | एक इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २१/०९/२०२३ रोजी रात्री २२/०० ते २२/३० वा.चे दरम्यान अमर भारत सोसायटी जवळ पवार यांचे खोलीत दुस-या माळयावर वारजे माळवाडी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे राहत असलेल्या पवार यांचे खोलीतील दुस-या माळयावर फिर्यादी यांची मुलगी सौ.शिला संतोष शिरसाठ,वय-३० वर्षे हीस फिर्यादी यांचे जावई यातील नमुद इसमाने सौ.शिला हिस दारु पिण्याकरीता पैशाची मागणी करुन,तीने पैसे दिले नसल्याचा राग मनात धरुन,तीचेशी भांडण व शिवीगाळ करुन,सौ.शिला हिस लाथा-बुक्क्यांनी मारहाण करून, साडीने तीचा गळा आवळुन,जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. ओलेकर ७५०६०७२७११ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोथरूड पो स्टे २१९/२०२३,भादविक ४५७,४५४,३८०,४२७,३४ |
| **फिर्यादी** | गौरव शिंदे,वय-३१ वर्षे,रा.अर्पन बंगलो,वारजे,पुणे |
| **आरोपीत** | कार मधील तीन अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २३/०९/२०२३ रोजीचे रात्रौ १०/३० वा.ते दिनांक २४/०९/२०२३ रोजी सकाळी ०६/३० वा.चे दरम्यान स्मार्ट कॅफे नावाची मोबाईल शॉपी,शॉप नं.४/५,कलाकृती हौसिंग सोसा.कोकण एक्सप्रेस हॉटेल समोर,डहाणुकर कॉलनी,कर्वेरोड,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे विघ्नहर्ता नावाचे मोबाईल दुकान असुन,स्मार्ट कॅफे ही विघ्नहर्ता मोबाईल शॉपीची चाईल्ड फर्म असुन,दोन्ही मोबाईल शॉपीचे दुकान आहे. यातील नमुद तीन अनोळखी इसमांनी आपसात संगनमत करून,फिर्यादी यांचे स्मार्ट कॅफे शॉपी दुकानाचे शटर कशाचेतरी सहाय्याने उचकटुन,दुकानाचे नुकसान करून,त्यावाटे आंत प्रवेश करून,दुकाना मधील कॅश कांऊटरचे ड्रॉवर मध्ये मोबाईल विक्री मधुन आलेले १,६३,८००/- रुपये रोख रक्कम व विविध कंपन्याचे विक्रीस ठेवलेले नविन बॉक्स पॅक २०० नग मोबाईल असा एकुण ५३,१३,२९२/- रु किमतीचा ऐवज घरफोडी चोरी करून नेला. |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस निरीक्षक, बालाजी सानप ०२०/२५३९१०१० |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विश्रांतवाडी पो स्टे २७३/२०२३,भादविक ४२०,३४ |
| **फिर्यादी** | एक नागरीक,वय-६९ वर्षे,रा.मुंजबा वस्ती,धानोरी,पुणे |
| **आरोपीत** | दोन अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२२/०९/२०२३ रोजी १७/०४ ते १८/०४ वा.चे दरम्यान महालक्ष्मी विहार सोसायटी, विश्रांतवाडी चौक,पुणे येथील बँक ऑफ महाराष्ट्र बँकेचे एटीएम सेंटर मधुन |

| | |
|---|---|
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे महालक्ष्मी विहार सोसायटी,विश्रांतवाडी चौक,पुणे येथील बँक ऑफ महाराष्ट्र बँकेचे एटीएम सेंटर मध्ये एटीएम कार्डावरून पैसे काढण्यासाठी गेले असताना, एटीएम सेंटर मधुन पैसे न आल्याने,त्यांचे पाठीमागे असलेल्या नमुद दोन अनोळखी इसमांनी फिर्यादी यांचे जवळ येवुन,त्यांना पैसे काढुन देण्याचे बहाण्याने फिर्यादी यांचे पत्नीचे नावाचे डेबीट एटीएमकार्ड पैसे काढुन घेण्याचे बहाण्याने घेवुन,हातचलाखीने कार्ड बदली करून,फिर्यादी यांचे बँकेचे अंकाऊट मधुन एटीएम डेबीटकार्डद्वारे वेग-वेगळ्या एटीएम सेंटर मधुन ४०,०००/- रूपये काढुन व विविध ठिकाणावरून ४७,५८०/- रू किचे वस्तु खरेदी करुन फिर्यादी यांची एकुण ८७,५८०/- रूपयेची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. महेश चव्हाण ९५९४४०१५०७ |
| **४** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | फरासखाना पो स्टे १७९/२०२३,भादविक ३७९ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-३२ वर्ष,रा.लक्ष्मीपुरी,कोल्हापुर |
| **आरोपीत** | एक इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २१/०९/२०२३ रोजी १२/५० वा.श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंदिरा समोर, शिवाजी रोड,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंदिराचे दर्शन घेत असताना,यातील नमुद इसमाने गर्दिचा फायदा घेवुन,फिर्यादी यांचेकडील १,३०,०००/- रू किचा मोबाईल चोरी करून नेला आहे. (फिर्यादी यांनी आजरोजी तक्रार दिली आहे.) |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. राऊत ९९२३८१४६१३ |
| **५** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विश्रामबाग पो स्टे २१३/२०२३,भादविक ३७९ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-५२ वर्षे,रा.कस्तुरबा गांधी वसाहत,औंध पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २४/०९/२०२३ रोजी १८/१५ वा.गुरुजी तालिम मंडळाच्या समोर गणपती चौक, विश्रामबाग,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया गणपती दर्शनाकरीता मंडई परीसरात गणपती चौक,गुरुजी तालिम मंडळाच्या समोर गणपती दर्शनाकरीता रोडवरून चालत असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने गर्दीचा व परिस्थितीचा फायदा घेवुन,फिर्यादी यांचे गळयातील सोन्याचे मणी असलेले पॅन्डल १५,०००/- रू किचे चोरी करुन नेले आहे. |
| **त.अंमलदार** | पोलीस अंमलदार, ठाकुर ०२०/२४४५७७५० |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**